## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ८३५/२०२२/अहमदनगर**

| | | |
|---|---|---|
| १ ॲड. हरिष शरद भांबरे,<br>रा.११९ अ, आनंद कॉम्पलेक्स,<br>सारसनगर अहमदनगर,<br>ता.जि.अहमदनगर-४१४००१. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन<br>सोसायटी, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी,<br>भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन<br>सोसायटी, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – २४/०६/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक ०२/०२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती देणे अपेक्षित असतांना माहिती अधिकार कायदा लागू नाही, असे नमूद करुन माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक २४/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी, तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दिनांक ०८/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/०१/२००० ते दिनांक ३०/१०/२०२१ या कालावधीतील १) प्राप्त अनुदान, २) कार्यरत शिक्षक, ३) खर्च केलेले अनुदान, ४) विदयार्थ्यांकडून जमा केलेली फी. ५) शिक्षकांना दिलेला पगार, ६) कॉलेजची मालमत्ता, ७) शासनाकडून घेतलेल्या परवानग्या, ८) विदयार्थ्यांच्या ॲडमिशनची नियमावलीच्या प्रती याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक ०९/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये बी.पी.एच.ई.सोसा ही ट्रस्ट असून माहिती अधिकार कायदयाअंतर्गत येत नाही, तरीदेखील आपण माहितीसाठी सोसायटीच्या संबंधित युनिटच्या प्राधिकऱ्यांशी संपर्क करु शकता, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक १०/१२/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक २५/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये बी.पी.एच.ई.सोसा. ही ट्रस्ट असून माहिती अधिकार कायदया अंतर्गत येत नाही, त्यामुळे अपील फेटाळले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी एकूण ८ माहिती अर्ज भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर कडे दाखल केले होते. त्यानुषंगाने दिनांक ०९/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये बी.पी.एच.ई.सोसा ही ट्रस्ट असून माहिती अधिकार कायदयाअंतर्गत येत नाही. तरीदेखील आपण माहितीसाठी सोसायटीच्या संबंधित युनिटच्या प्राधिकऱ्यांशी संपर्क करु शकता, असे कळविले.

सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी सांगितले की, माहिती अर्जान्वये मागितेली माहिती न पुरविता सदर संस्थेला माहिती अधिकार कायदा लागू नाही, असे कळविले. तरी याबाबत. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.२६/२०११, २७/२०११, २८/२०११, २९/२०११, ३०/२०११ संदर्भात दिनांक १८/१०/२०१२ अन्वये माहिती अधिकार कायदा सदर संस्था व कॉलेजला लागू असल्याने सदर माहिती मिळावी.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०८/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०९/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये बी.पी.एच.ई.सोसा ही ट्रस्ट असून माहिती अधिकार कायदयाअंतर्गत येत नाही, असे कळविल्याचे दिसून येते.

मात्र याबाबत नमूद करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.२६/२०११, २७/२०११, २८/२०११, २९/२०११, ३०/२०११ संदर्भात दिनांक १८/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशात नमूद केले आहे की,

"Whether Educational Institutions managed, administered and controlled by a Public Charitable Trust fall within definition of public authority under Section 2(h) of RTI Act-Held, educational institutions are bodies controlled or substantially financed by appropriate Government and, therefore, covered by the definition - Information can be sought by approaching both the educational institutions and the parent entity controlling them or either - Duty and obligation to provide information as long as right to seek it is enforceable by RTI Act, must be Discharged by Public Authority."

"To view a school and college or a educational institution in isolation and a separate legal entity and only deal with or approach them would mean that the citizens right which is paramount and predominant will be rendered nugatory and cannot be exercised and enforced by them."

त्यानुसार ज्या संस्थांच्या शाळांना वेतनाचे अनुदान प्राप्त होते. त्या संस्थांना माहितीच्या अधिकारातील तरतूदी लागू होतात. अशा प्रकरणी संस्था व शाळा यांना वेगळे समजता येणार नाही. संस्था व शाळा अभिन्न असून एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सदर संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होतात.

तरी आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज ५ दिवसांचे आत माहितीशी संबंधित महाविदयालयाकडे वर्ग करावा. त्यानंतर संबंधित महाविदयालयाने अपिलार्थीस माहिती/ वस्तुस्थितीदर्शक् उत्तर पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी, भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ०५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांचा दिनांक ०८/११/२०२१ रोजीचा माहिती अर्ज माहितीशी संबंधित महाविदयालयाकडे वर्ग करावा. त्यानंतर संबंधित महाविदयालयाने सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत कार्यालयातील उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावे.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ८३५/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत पुणे-४११००१.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.८३५/२०२२/अहमदनगर/ओ- 2044 दिनांक - १९/१०/२०२२